महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, उस्मानाबाद

## Government Medical College & Hospital, Osmanabad

Dist Hospital, Campus, Osmanabad - 413501, M.S. (INDIA)

Telephone & Fax No. 02472- 297440 Email- deangmcosmanabad@gmail.com

जा.क्र.शावैमरुज/ अग्निरोधक /खरेदी/२०२२-२३/ 2204 /२०२३. दि. 14/०२/२०२३.

दरपत्रक मागणी पत्र

प्रति,

-------------------------------

-------------------------------

विषय - अग्निरोधक कुपायांच्या नूतनीकरता लागणाऱ्या साहित्याचे दरपत्रक सादर करणेबाबत......

संदर्भ :- १) जा.क्र.शावैमवज/ रुग्णालय विभाग/ 14132 /2022, दि.17/10/2022.

२) या कार्यालयाची दि.२५/१२/२०२२ रोजीची मंजूर टिप्पणी.

वरील संदर्भीय विषयान्वये सादर करण्यात येते की, नवनिर्मीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, उस्मानाबाद येथे पदनिर्मीतीस शासनाने मंजुरी प्रदान केलेली असुन मा.संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई व संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांच्या स्तरावर सामंजस्य कराराची प्रकिया पुर्ण झालेली आहे. त्यानुसार उस्मानाबाद येथे जिल्हा सामान्य रुग्णालय, उस्मानाबाद यांचे आवारात वैद्यकीय महाविद्यालय कार्यान्वयीत झालेले असून संलग्नित रुग्णालय महणून जिल्हा सामान्य रुग्णालय उस्मानाबाद व स्त्री रुग्णालय उस्मानाबाद हे महाविद्यालयास हस्तांतरित करण्यात आलेले आहे.

या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील विविध विषयातील विभाग,ग्रंथालय विभाग,प्रशासकीय कार्यालय,वैद्यकीय वसतीगृहात विविध कक्षातील (वॉर्ड),आंतररुग्ण व बाहयरुग्ण विभाग या ठिकाण आवश्यक असणा-या अग्निरोधक कुप्यांच्या नूतनीकरण करण्यांकरिता लागणा-या साहित्यांचे दरपत्रक खालील प्रमाणे यादीनूसार सादर करण्यांत यावे.

तसेच सदर सूचनेनूसार मोहरबंद दरपत्रके मा.अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,उस्मानाबाद यांचे नावे सादर करण्यांत यावे. तसेच सदरील साहित्यांचे दरपत्रक सादर करण्यांसाठी अंतिम दिनांक 24/०२/२०२३ रोजी दूपारी ५.४५ पर्यंन्त असून प्राप्त झालेली दरपत्रके दिनांक.——/०२/२०२३ रोजी प्रशासकीय कार्यालयात खरेदी समिती समोर उघडण्यांत येतील. तसेच दरपत्रक धारकास दरपत्रक उघडण्यां करिता उपस्थित राहावयाचे असल्यास या कार्यालयाची कांहीही हरकत नाही.

| Sr No | PERTICULARS | Size | Qty | Rate |
|---|---|---|---|---|
| 1 | DCP refilling dry powder | 05 kg | 01 | |
| 2 | DCP refilling dry powder | 10 kg | 01 | |
| 3 | ABC refilling dry chemical powder | 04 kg | 01 | |
| 4 | ABC refilling dry chemical powder | 06 kg | 01 | |
| 5 | ABC refilling dry chemical powder | 09 kg | 01 | |
| 6 | ABC refilling dry chemical powder | 05 kg | 01 | |
| 7 | Water Co2 refilling | 09 Lit | 01 | |
| 8 | Mechanical foam | 09 Lit | 01 | |
| 9 | DCP fire extinguisher cap | ------ | 01 | |
| 10 | ABC wall with guage | 6kg/9kg | 01 | |
| 11 | DCP hose | 5kg | 01 | |
| 12 | DCP hose | 10 kg | 01 | |
| 13 | ABC hose | 6kg/9kg | 01 | |
| 14 | Brass Spindle | ------ | 01 | |
| 15 | Rubber washer | ------ | 01 | |

| अ.क्र. | महत्वाच्या अटी व शर्ती |
|---|---|
| 1 | दरपत्रक धारकाने मुंबई दूकाने व अस्थापना अधिनियम १९४८ नूसार दूकानाचे शासन मान्य नोंदणी प्रमाणपत्र किंवा सूक्ष्म,लघू व मध्यम उध्यम मंत्रालय भारत सरकार यांच्याकडे नोंदणी केलेले उद्योग आधार प्रमाणपत्र छायांकित प्रत दरपत्रकासोबत जोडणे बंधनकारक आहे. |
| 2 | दरपत्रक धारकाच्या दूकानाचे नाव,संपूर्ण पत्ता,दूकान नोंदणी प्रमाणपत्र,जिएसटी नंबर,पॅन नंबर,संपर्क मो.नं.,नोंद असलेल्या दूकानाच्या लेटर पॅडवर स्वाक्षरी व शिक्का असलेली दरपत्रके सदर साहित्याच्या अ.क्र.यांदीनूसार सादर करण्यांत यावी तसेच ज्या साहित्यांचे दर उपलब्ध होवू शकत नाहीत त्या साहित्यांच्या दराच्या ठिकाणी एन.ए. असे नमूद करावे. |
| 3 | दरपत्रकासोबत शासन मान्य जि.एस.टी.मान्य प्रमाणपत्र,कंपनीच्या नावाचे किंवा प्रोप्रायटरच्या नावाचे पॅन कार्डची छायांकित प्रत,२०२१-२०२२ यां वर्षाची आय.टी.रिटर्न प्रमाणपत्र तसेच एकल दरपत्रक धारक असल्याचे स्वतः स्वाक्षरीचे प्रमाणपत्र जोडणे बंधन कारक आहे. (सदर नमूना प्रमाणपत्र पान क्र.०३ वर देण्यांत आलेला आहे.) |
| 4 | दरपत्रकातील साहित्यांचे दर शासन निर्णयानूसार सर्व करांसहित देण्यांत आलेले आहे, किंवा कराव्यतीरिक्त देण्यांत आलेले आहे. या बाबत सविस्तर नोंद करण्यांत यावी. तसेच सर्व साहित्यांचे दर बाजार भावांपेक्षा जास्त दराचे सादर करण्यांत येवू नये, तसेच सर्व सहित्य पूढिल एक वर्ष वैद्य कालावधीचे व चांगल्या प्रतिचे असावे,हलके किंवा निकृष्ठ दर्जाचे असल्यास पूरवठा आदेश तात्काळ रद्द करण्यांत यावे तसेच सदर साहित्य स्वतः स्वखर्चाने पूरवठा आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एक महिण्यांच्या आत पूरवठा करणे बंधनकारक राहिल. तसेच वाहतून खर्च किंवा इतर जादा खर्च देण्यांत येणार नाही. मागण्यांत आलेल्या साहित्याचे दरपत्रक प्रमाणित झाल्याच्या दिनांकापासून ०६ (सहा) महिण्यांपर्यन्त वैद्य राहिल. |
| 5 | प्रशासकीय कारणास्तव देयके अद करण्यांस विलंब झाल्यास विलंब शूल्क किंवा व्याज देण्यांत येणार नाही. |
| 6 | उपरोक्त प्रमाणे नमूद अग्निरोधक कृप्या नोंदणी करण्यांसाठी संबंधित विभागाकडून जमा करुन घेऊन जाणे बंधनकारक राहिल. तसेच सदरील कृप्या भरल्यानंतर सदर विभागात पोच करणे व पोच पावती देयकाबरोबर सादर करणे बंधनकारक राहिल. सदर अट मान्य असल्यास सदरील दरपत्रक सादर करण्यांत यावे. |
| 7 | तसेच अपूर्ण माहितीसह व प्रमाणपत्रशिवाय सादर केलेली संबंधिताचे दरपत्रके विनास्पटीकरण नाकारण्यांत येतील. तसेच प्रशासकीय कारणास्तव किंवा निधी अभावी कांही अडचणी निर्माण झाल्यास साहित्य खरेदी बाबत सदरच्या दरपत्रकाची संपूर्ण प्रक्रिया रद्द कराण्यांचा अधिकार अधिष्ठाता यांना राहिल. |
| 8 | सदर आदेशान्वये या कार्यालयाने मागणी केलेले प्रमाणपत्र दरपत्रकसह सादर करण्यांत यावे अन्यथा इतर कागदपत्रे सादर केल्यास सदर दरपत्रक रद्द करण्यांत येईल.व याबाबत लेखी किंवा मौखिक स्वरुपात कळविण्यांत येणार नाही. याची सर्वस्वी जवाबदारी आपली राहिल.उपरोक्त प्रमाणे अटी व शर्ती मान्य असल्यासच सदर बाबींचे दरपत्रक सादर करण्यांत यावे. |

अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
उस्मानाबाद.

प्रत :- सुचना फलक/ संकेतस्थळ जाहीर नोटिस, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, उस्मानाबाद.
प्रत :- संकेतस्थळ जाहीर नोटिस, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, उस्मानाबाद.

महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, उस्मानाबाद

**Government Medical College & Hospital, Osmanabad**

District Hospital Premises, Osmanabad - 413501, M.S. (INDIA)

Email- deangmcosmanabad@gmail.com

जा.क्र.शावैमज/अग्निरोधक/खरेदी/२०२२-२३/ 2204 /२०२३. दि.14/०२/२०२३.

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, उस्मानाबाद

### दरपत्रक नोटिस

सन 2022-23 या वित्तीय वर्षात यत्रंसामग्री व साधनसामग्री राज्य योजना अंतर्गत योजनामधून (नॉनप्लॅन) मंजूर अनुदानातुन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या अंतर्गत असलेल्या विविध विषयातील विभाग,ग्रंथालय विभाग,प्रशासकीय कार्यालय,वैद्यकीय वसतीगृहात विविध कक्षातील (वॉर्ड),आंतररुग्ण व बाहयरुग्ण विभाग या ठिकाण आवश्यक असणा-या अग्निरोधक कृप्यांचे नूतनीकरण करावयाचे आहे. करिता इच्छुक पुरवठादानांनी सोबत जोडलेल्या यादीनुसार दरपत्रके सादर करावयाची असतील अशा पुरवठादारांनी पुरवठा करावयाच्या छपाई दरपत्रके यांची मुळ प्रत दिनांक 14/02/2023 ते दि24/02/2023 पावेतो कार्यालयीन वेळेत सकाळी 10.00 ते सांयकाळी 05.45 वाजेपर्यंत प्राप्त करावी. सदरील दरपत्रके दरपत्रकातील अटी व शर्तीनुसार मोहरबंद लिफाफयामध्ये दिनांक24-/02/2023 रोजी पावेता सायंकाळी 05.30 वाजेपर्यंत जमा/सादर करावीत.

| कार्यालयाचा पत्ता |
|---|
| अधिष्ठाता,<br>शासकीय वैद्यकीय महावद्यालय,<br>जिल्हा सामान्य रुग्णालय आवार,<br>उस्मानाबाद - 413501 |

अधिष्ठाता,<br>
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,<br>
उस्मानाबाद.

प्रत :- सुचना फलक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, उस्मानाबाद.

प्रत :- संकेतस्थळ जाहीर नोटिस, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय , उस्मानाबाद.

**एकल दरपत्रक अधिकृत विक्रेता/पुरवठादार/कंपनी यांचे लेटरहेड**

Letter No. Date :-

प्रति
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
उस्मानाबाद.

विषय :- एकल दरपत्रक सादर करणेसंबंधीचे हमीपत्र सादर करणेबाबत...

संदर्भ :- आपले दरपत्रक मागणी पत्र
क्रमांक. ______________________
दिनांक ______________________

महोदय

संदर्भांकित दरपत्रक मागणी पत्रानुसार मागणी करण्यात आलेले एकल दरपत्रक सादर करण्यासंबंधीचे हमीपत्र मी खालील प्रमाणे सादर करीत आहे.

## हमीपत्र (Undertaking)

याद्वारे हमी देतो की, दरपत्रक प्रक्रियेसाठी एकच दरपत्रक सादर करीत आहे. आमच्याच फर्मशी निगडीत असलेल्या कुठल्याही व्यक्तीच्या नावे किंवा अप्रत्यक्षपणे केवळ आम्हास लाभ होईल, अश्याप्रकारे दुसरे दरपत्रक दरपत्रकप्रक्रियेमध्ये सादर केलेला नाही. तसेच माझा/आमचा आपल्या कार्यालयातील खरेदी प्राधिकाऱ्यांशी कुठलेही हितसंबंध नाही.

उक्त बाब भविष्यात असत्य/खोटी आढळुन आल्यास, सर्वस्वी जबाबदारी आमची राहील. नियमानुसार होणाऱ्या कार्यवाहीस मी/आम्ही पात्र असू. तद्संबंधी माझी/आमची कुठलीही हरकत राहणार नाही. अशी याद्वारे हमी देत आहे.

अधिकृत व्यक्तिचे नाव व स्वाक्षरी,
शिक्का अणि मोहर
Authorized Person Name, signature
with Stamp and Seal

**मागणी पत्रातील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत हमीपत्र**
**दरपत्रकधारक अधिकृत विक्रेता/पुरवठादार/कंपनी यांचे लेटरहेड**

Letter No. Date :-

प्रति
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय,
उस्मानाबाद.

विषय :- दरपत्रक मागणी पत्रातील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत हमीपत्र सादर करणेबाबत...

संदर्भ :- आपले दरपत्रक मागणी पत्र
क्रमांक. ____________________
दिनांक ____________________

महोदय

संदर्भाकिंत दरपत्रक मागणी पत्रातील सर्व अटी व शर्ती मी वाचून दरपत्रक दरपत्रकप्रक्रियेसाठी सादर करीत आहे. सर्व अटी व शर्ती मान्य असून तद्संबंधीचे हमीपत्र खालील प्रमाणे सादर करीत आहे.

## हमीपत्र (Undertaking)

याद्वारे हमी देतो की, दरपत्रक मागणी पत्रात नमुद असलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असुन, त्यांचे तंतोतंत पालन करण्यात येईल. तसेच दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात सादर करण्यात आलेली संपुर्ण माहिती, दस्ताऐवज, व करारनामे इ. भविष्यात असत्य/बनावट/अवैध आढळुन आल्यास, सर्वस्वी जबाबदारी आमची राहील. नियमानुसार होणाऱ्या कार्यवाहीस मी/आम्ही पात्र असू. तद्संबंधी माझी/आमची कुठलीही हरकत राहणार नाही. अशी याद्वारे हमी देत आहे.

अधिकृत व्यक्तिचे नाव व स्वाक्षरी,
शिक्का अणि मोहर

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, आपल्या कार्यालयाच्या दरपत्रक मागणी आदेशानुसार मागविण्यात आलेल्या साहित्यांच्या दरपत्रकात माझे स्वतःचे एकच दरपत्रक असून आपणास प्राप्त झालेल्या दरपत्रकात माझे दुसरे दरपत्रक सादर करण्यात आलेले नाही,तसेच आपल्या कार्यालयाबरोबर माझे कोणतेही हितसंबंध नाहीत याबाबत पुढील काळात सदर बाब आपल्या कार्यालयाच्या निदर्शनास आल्यास माझ्यावर होणाऱ्या दंडात्मक कार्यवाहीस मी स्वतः जबाबदार राहील.करिता सदर प्रमाणपत्र सादर करण्यात येत आहे.

दरपत्रक धारकाची स्वाक्षरी व शिक्का

दिनांक :-

ठिकाण :-

नाव :-

पत्ता :-

मो. नं. :-